दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ८८ वा गुरूवार दि.०५ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विश्वशांती बुद्ध विहाराचे लोकार्पण






### विहाराची वैशिष्ट्ये

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते आज लोकार्पण झालेले उदगीर येथील विहार कर्नाटक येथील कलबुर्गीच्या बुद्ध विहाराची प्रतिकृती आहे. एक हेक्टर १५ आर जागेवर या विहाराची उभारणी करण्यात आली आहे. विहारात १२०० अनुयायांची बैठक व्यवस्था असलेले ध्यान केंद्र तयार करण्यात आले आहे. विहार परिसरात प्रवेश करण्यासाठी एक मुख्य प्रवेशद्वार तयार करण्यात आले आहे. या प्रवेशद्वाराची रचना बिहारमधील सांची स्तूपाप्रमाणे करण्यात आली आहे.

उदगीर :- उदगीर येथील तळवेस परिसरातील नवनिर्मित विश्वशांती बुद्ध विहाराचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते आज लोकार्पण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, विशेष अतिथी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, रमेश कराड, अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचीही उपस्थिती होती.

सुरूवातीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते कोनशिलेचे अनावरण, फीत कापून विहाराचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रपती यांनी विहारातील गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बुद्ध वंदना झाली. वंदनेनंतर उपस्थित बौद्ध भिक्कूंना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू चिवर दान केले. बौद्ध भिक्कू यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना गौतम बुद्धांची मूर्ती भेट दिली. क्रीडा मंत्री बनसोडे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

## हेलीकॉप्टर उडाले आकाशी; लाडक्या बहिणी राहिल्या उपाशी

लातूर : प्रतिनिधी उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणि शासन आपल्या दारी योजना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जिल्ह्याचे पालक मंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे आणि महिला व बाल कल्याण मंत्री श्रीमती आदिती तटकरे यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रम होईपर्यंत बहिण लाडकी होती. कार्यक्रम आटोपल्यानंतर मात्र बहिणींची अवस्था हेलीकॉप्टर उडाले आकाशी, लाडक्या बहिणी राहिल्या उपाशी, अशी झाली. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावरील विचारपिठावर दुपारी १२.१७ वाजता राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांचे आगमन झाले. स्वागत समारंभ, विविध योजनांतील लाभार्थ्यांना



प्रमाणपत्राचे वितरण, मान्यवरांचे मनोगत झाल्यानंतर दुपारी १.२३ वाजता राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या भाषणाला सूरुवात झाली. त्यांनी महिला सक्षमीकरणाविषयी अत्यंत प्रभावीपणे आपले मनोगत व्यक्त केले. दुपारी १.३६ वाजण्याच्या सूमारास राष्ट्रपतींचे मनोगत संपले. त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

सर्व मान्यवरांचा ताफा शासकीय विश्रामगृहाकडे गेला. पोलिसांनी शासकीय विश्रामगृह ते महाराष्ट्र देवगिरी महाविद्यालयासमोरील प्रांगणातील हेलीपॅडपर्यंतचा संपूर्ण रस्ता ताब्यात घेतला. सर्वप्रकाची वाहने रोखण्यात आली. राष्ट्रपतींचा कॅन्वा गेल्याशिवाय एकही वाहन सोडले नाही. कार्यक्रमास आलेल्या सर्व लाडक्या बहिणी रस्त्याच्या दूतर्फा थांबेलल्या होत्या, काही बहिणी थकुन खाली बसल्या होत्या. पाऊसात भिजत होत्या. काही बहिणी भूक लागल्याने बिस्कुट, फरसान खात होत्या. दरम्यान सर्व मान्यवरांनी विश्रामगृहावर भोजन घेतल्यानंतर त्यांचा ताफा हेलीपॅडकडे निघाला. दुपारी ३.३८ वाजण्याच्या सुमारास मान्यवरांना घेऊन हेलीकॉप्टर आकाशी उडाले. बहिनी मात्र उपाशी राहिल्याचे चित्र कार्यक्रम स्थळी होते. हेलीकॉप्टर आकाशी उडाल्यानंतर पोलिसांनी वाहतूक सुरु केली. वाहनांची पार्कींग कार्यक्रमस्थळापासून दोन-तीन किलो मीटरवर होती. लाडक्या बहिणींनी कसेबसे चालत वाहनतळ गाठून वाहनांत बसल्या आणि आपापाल्या गावी निघून गेल्या.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे उदगीर येथील हेलिपॅडवर आगमन



लातूर : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आज सकाळी हेलिकॉप्टरने नांदेड येथून उदगीर येथील हेलिपॅडवर आगमन झाले.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी पोलीस अतिरिक्त पोलीस महासंचालक दिपक पांडे, एनसीसी, लातूरचे एओ लेफ्टनंट कर्नल वायबी सिंग, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे उपस्थित होते.

## माजी मंत्री आमदार अमित देशमुखांची शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी शेतकऱ्यांना तातडीची मदत करण्याची सरकारकडे मागणी

### लातूर, चाकूर, देवणी तालुक्यातील विविध ठिकाणी केली पाहणी

लातूर / प्रतिनिधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज बुधवार दि. ४ सप्टेंबर २४ लातूर तालुक्यातील कातपूर, चाकूर तालुक्यातील घरणी, देवणी तालुक्यातील जवळगा येथे भेट देऊन, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी केली. अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान झाले आहे. शासन आणि प्रशासनाने या संकटात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे रहावे. लवकरच सर्व पंचनामे पूर्ण करून शेतकऱ्यांना मदत पुरवली जावी अशी मागणी त्यांनी केली. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर तालुक्यातील कातपूर येथील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी बाळकृष्ण देशमुख, शेतकरी हनमंत देशमुख, शेतकरी उत्तम पडवळ यांच्या शेतातील सोयाबीन पिकाची पाहणी केली. देवणी तालुक्यातील जवळगा येथील अतिवृष्टीमुळे व मांजरा नदीचे पाणी शेतात घुसल्याने




नुकसान झालेल्या शेतकरी दयानंद मुळजे शेतकरी राम त्रंबक गजबा यांच्या शेतातील बांधावर जाऊन उडीद, तुर, ऊस, सोयाबीन पिकाची पाहणी करून तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्ताना सरसकट मदत करण्याची मागणी केली. या पार्श्वभूमीवर आमदार देशमुख यांनी पंचनामे प्रक्रिया त्वरीत करून शेतकऱ्यांना शासकीय मदत उपलब्ध करून देण्याचीही मागणी सरकारकडे केली. यावेळी कातपूर येथे लातूर तालुका कृषी अधिकारी दिलीप राऊत, मंडळ कृषी अधिकारी राजू येवले, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. तर घरणी येथे माजी मंत्री विनायकराव पाटील, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक एन. आर. पाटील, चाकुर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विलास पाटील चाकूरकर, चाकूर तालुका कृषी अधिकारी संजय गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी शिरीष खंदाडे, प्रकाश पाटील, कृषी प्रव्यवेक्षक बालाजी घोडके कृषी सहाय्यक भाग्यश्री उगीले तलाठी बालाजी हाके, चंद्रकांत मद्दे, सिराजुद्दीन जहागीरदार, निळकंठ मिरकले, शिवाजी बैनगिरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे चाकूर तालुकाप्रमुख नंदकुमार पवार, अंगद पवार, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, अण्णासाहेब पाटील निलेश देशमुख, अनिल चव्हाण, भागवत फुले तर देवणी तालुक्यात पाहणी करतांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंके, निलंगा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विजयकुमार पाटील लातूर जिल्हा काँग्रेस डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ. अरविंद भातंबरे, माजी सभापती अजित माने, देवणीचे उपनगराध्यक्ष अमित मानकरी, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक दिलीप पाटील नागराळकर, आबासाहेब पाटील उजेडकर, महेश देशमुख, देवणी तालुका कृषी अधिकारी संजय पाटील, कृषी सहाय्यक अण्णासाहेब बंडगर, कृषी सहाय्यक दत्तात्रय गुणाले, कृषी पर्यवेक्षक विनायक सूर्यवंशी, चक्रधर शेळके, वैजनाथ डुल्ले, ज्ञानेश्वर पाटील, अनिल पाटील, बसवराज मठपती, बाळासाहेब पाटील, शिवराज धुमाळ आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी संबंधित विभागाचे अधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

## अखेर एसटी कर्मचाऱ्यांचा संप मागे; पगारात ६,५०० रूपयांची वाढ

आज एसटी कृती समिती आणि मुखमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामध्ये सह्याद्री अतिथीगृहावर बैठक पार पडली. मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर एसटी कर्मचाऱ्यांनी आपला संप मागे घेतला आहे. कर्मचाऱ्यांच्या मूळ पगारामध्ये ६ हजारांची वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एसटी कर्मचाऱ्यांनी अखेर संप मागे घेतला आहे. एसटी कर्मचाऱ्यांची आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकीत एसटी कर्मचाऱ्यांच्या काही मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे शासनाने एसटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ६,५०० रुपयांची वाढ केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज एसटी कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा काढण्यासाठी बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार तसेच मंत्री उदय सामंत आणि अन्य अधिकारी वर्ग उपस्थित होता. तसेच या बैठकीला कामगार संयुक्त कृती समितीचे शिष्टमंडळ उपस्थित होते. तसेच भाजप आमदार गोपीचंद पडळकर, सदाभाऊ खोत, वकील गुणरत्न सदावर्ते तसेच एसटी कष्टकरी जनसंघाच्या जयश्री पाटील उपस्थित होत्या. आजच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संपावर तोडगा काढणार का याकडे सर्वांचे लक्ष होते. एसटी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मूळ वेतनात ५ हजार रुपयांची वाढ करण्याची मागणी केली होती. मात्र राज्य सरकारने तब्बल ६,५०० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

बैठकीनंतर भाजप आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले, मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार तसेच उद्योगमंत्री उदय सामंत यांचे मनापासून आभार मानतो. राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांनुसार राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांना वेतन मिळावे अशी आमची मागणी होती.

## पोलिस महासंचालक रश्मी शुक्लांचे तात्काळ निलंबन करा

मुंबई : प्रतिनिधी महिलांवरील अत्याचार, भ्रष्टाचार, आत्महत्या, हत्या याचे प्रमाण गेल्या काही वर्षांत वाढले आहे. बदलापूर येथील घटनेनंतर तर राज्यातील महायुती सरकार कायदा-सुव्यवस्था राखण्यात पूर्णत: अपयशी ठरले असून पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांचे तात्काळ निलंबन करा आणि



उपमुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. पटोले यांनी म्हटले आहे की, बदलापूरमध्ये चिमुकल्यांवर १५ दिवस अत्याचार सुरू होते, हे उघड झाले आहे, शाळेतील १५ दिवसांचे सीसीटीव्ही फुटेजही गायब आहे.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### शेतकर्यांचे उत्पन्न

देशातील शेतकर्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणि व्यवस्थापनावर भर देणार्या सात महत्त्वपूर्ण योजनांना केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या सर्व योजनांवर १४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी खर्च केला जाणार आहे. सरकारने ज्या सात योजना जाहीर केल्या त्या कागदावर जरी व्यवस्थित दिसत असल्या तरी त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे होणार आहे, हा मात्र संशयाचा मुद्दा असू शकतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी २०१४ मध्ये जेव्हा पहिल्यांदा पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी आपल्या पहिल्याच भाषणामध्ये २०२२ पर्यंत देशातील शेतकर्याचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा केली होती.

आता २०२४ मध्ये तिसर्यांदा पंतप्रधानपदावर विराजमान झालेल्या नरेंद्र मोदी यांनी देशातील बळीराजाचे उत्पन्न खरोखरच दुप्पट झाले आहे की नाही याचा शोध घेण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये पंजाब, हरियाणा आणि दिल्लीसह देशाच्या विविध राज्यांमध्ये ज्या प्रकारे शेतकरी आंदोलने होत आहेत ती पाहता देशातील बळीराजा समाधानी नाही आणि त्याच्या उत्पन्नामध्येही समाधानकारक वाढ झालेली नाही हेच समोर येताना दिसत आहे.

साहजिकच केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या या निर्णयांचाही समावेश यापूर्वी घेण्यात आलेल्या शेतकरीविषयक निर्णयांच्या यादीमध्ये झाला, तर त्याचा काहीच उपयोग होणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेवर आल्यापासून 'डिजिटल इंडिया'चा नारा दिला आहे आणि आता या नव्या निर्णयांमध्येसुद्धा शेतकर्यांसाठी डिजिटल माध्यमाचा वापर करण्यावर जास्त भर असणार आहे. पण गेल्या अनेक वर्षांपासून देशातील बळीराजाचा जो मूलभूत प्रश्न आहे तो म्हणजे त्याच्या शेतीमालाला योग्य किंमत मिळणे.

त्याबाबत जर योग्य विचार झाला तरच शेतकर्याचे उत्पन्न दुप्पट करण्याचे स्वप्न साकार होऊ शकते. याचा विचार सर्व सत्ताधार्यांना करावा लागणार आहे. वर्षभर मेहनत करून शेतकरी आपल्या शेतामध्ये जरी पिके पिकवत असला तरी ती अनेक वेळा एजंटांच्या आणि मध्यस्थाच्या घशात जातात आणि हे एजंट आपली तिजोरी गरम करतात आणि शेतकर्यांच्या खिशात मात्र किरकोळ पैसे पडतात. ही प्रक्रिया वर्षानुवर्षे सुरू आहे. देशात सर्वच तालुका पातळीवर जरी कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन झाल्या असल्या, तरी या बाजार समित्यांनासुद्धा राजकारणाचे वलय असल्यामुळे त्याचा फटका या बाजार समितीच्या कार्यपद्धतीला अनेक वेळा बसताना दिसतो.

बाजार समितीच्या माध्यमातून जरी शेतकर्यांनी शेतमाल विक्रीसाठी उपलब्ध करून दिला तरी त्याला योग्य तो भाव मिळतोच अशी कोणतीही खात्री देता येत नाही. जगातील सर्वात प्रमुख साखर उत्पादक देश असलेल्या भारतामध्ये दरवर्षीच उसाला एफआरपी देण्यासाठी शेतकर्यांना आंदोलन करावी लागत आहेत, याचा अर्थ काय घ्यायचा. साखरेसारख्या महत्त्वाच्या नगदी पिकाला दरवर्षी योग्य दर मिळण्यासाठी जर आंदोलन करावे लागत असेल, तर नियोजन पातळीवरच काहीतरी, कुठेतरी चुकते आहे हे आता मान्य करावे लागणार आहे. कांदा आणि टोमॅटो या पिकांबाबतही दरवर्षी दराबाबत गोंधळ सुरू असतो. या दोन्ही पिकांच्या किमती वाढल्या की सर्वसामान्य नागरिक हैराण होतात आणि त्याच्या किमती कमी झाल्या तर शेतकर्यांच्या खिशात काहीच पडत नाही. दरवर्षीच अशा अनेक पिकांबाबत हा दराचा आणि किमतीचा गोंधळ सुरू असूनही अद्याप त्यावर तोडगा निघालेला नाही. कधी कांद्याच्या निर्यातीवर बंदी घालायची, तर कधी ती निर्यात बंदी उठवायची याव्यतिरिक्त कोणते वेगळे धोरण सरकारी पातळीवर आखले जात आहे, असेही दिसत नाही. साहजिकच मंत्रिमंडळाने घेतलेले हे जे सात निर्णय आहेत ते वरवर जरी आदर्श वाटत असले, तरी कोणत्याही शेतकर्याच्या विकासासाठी त्याला त्याच्या शेतमालासाठी चांगला पैसा मिळवून देणे हेच उद्दिष्ट समोर ठेवून काम करणे नेहमी महत्त्वाचे असते. मुळात भारतीय शेती पावसावर अवलंबून आहे आणि हा पाऊस जर कमी झाला तर शेतीचे नुकसान होतेच आणि अतिवृष्टी झाली तरीसुद्धा शेतीचे नुकसान होते. देशात अद्यापही शंभर टक्के जलसिंचनाचे उद्दिष्ट पूर्ण झाले नसल्याने पावसावर अवलंबून असणारी शेती नेहमीच बळीराजाला संकटात टाकत असते. या सर्व मूलभूत गोष्टींचा विचार करण्याऐवजी डिजिटल यंत्रणांचा वापर करण्याचा आधुनिक विचार केला जात आहे. आधुनिक काळामध्ये जरी डिजिटल यंत्रणा वापरणे अपरिहार्य असले तरी भारतातील अनेक खेड्यांमध्ये अद्यापही शेतकर्याला २४ तास वीज उपलब्ध होत नाही. तो शेतकरी या डिजिटल यंत्रणेचा वापर तरी कसा करणार, हा एक प्रश्नच आहे. एखाद्या वर्षी शेतकर्याला चांगले उत्पादन मिळाले तरी योग्य दर मिळेपर्यंत ते उत्पादन साठवण्याची क्षमताही अनेक शेतकर्यांकडे नसते. कारण शेतीमाल हा नाशवंत असल्यामुळे कोल्ड स्टोरेजचीसुद्धा पुरेशा प्रमाणात भारतामध्ये अद्याप सोय झालेली नाही. काही मोठ्या बाजार समित्यांमध्ये जरी अशा प्रकारची कोल्ड स्टोरेज असली तरी ती पुरेशी पडत नाहीत. या सर्व मूलभूत सुविधांचा प्राधान्याने विचार केला आणि त्या दिशेने प्रथम प्रयत्न केले, तरच शेतकर्याला आपले काम करणे सोपे जाणार आहे. ज्या अर्थी महाराष्ट्रासारख्या देशातील सर्वात प्रगत राज्यामध्ये अजूनही शेतकर्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढतच चालले असेल तर त्या अर्थी शेतकर्यांच्या सर्व समस्या सोडवण्यात अद्यापही सरकारला यश आलेले नाही, हाच एक निष्कर्ष काढता येऊ शकतो. शेतकर्याचे कर्ज माफ करणे किंवा त्याच्या कर्जावरील व्याज माफ करणे अशा प्रकारच्या योजना केवळ वरवरची मलमपट्टी करण्याचे काम करत असतात. मुळात शेतकर्याने कर्जबाजारी होऊ नये आणि घेतलेले कर्ज त्यांनी फेडावे अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करण्याचे काम सरकारी पातळीवर कधी होणार आहे, या प्रश्नाचे उत्तर आता शोधावे लागणार आहे. देशातील बळीराजाला सर्व मूलभूत सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिल्या, तरच शेती फायदेशीर ठरू शकते आणि त्यानंतरच शेतकर्याचे उत्पन्न वाढवण्याचा विचार प्रत्यक्षात येऊ शकतो, हे लक्षात घेतले पाहिजे.

# संकल्प विकसित भारताचा, पण

कॅप्टन प्रा. डॉ. बाळासाहेब गोडबोले : एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व

काही व्यक्ती असे असतात की त्यांचे व्यक्तिमत्व विविध कला, गुण, कौशल्य व विविधतेने भारावलेले असते. विविध क्षेत्रातील कार्यांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक पैलूंचा समावेश झालेला असतो. तुझ्या क्षेत्राच्या पदावर जातात त्यावर आपल्या कार्याचा ठसा उमटवतात, आपले वेगळे पण सिद्ध करून आपल्या नाविन्यपूर्ण कार्याने या पदाला न्याय देऊन त्या पदाची प्रतिष्ठा वाढवतात. त्यापैकी बहू आयामी असलेले एक व्यक्तिमत्व म्हणजे महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील भूगोल विभाग प्रमुख कॅप्टन प्रा. डॉ. बाळासाहेब मुकुंदराव गोडबोले सर ३२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सर नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्या सेवानिवृत्ती निमित्त त्यांच्या कार्याचा आलेख प्रस्तुत लेखातून मांडत आहे. या संबंधी लेखन करण्यासाठी त्यांच्या कार्याचा मागवा घेण्यासाठी मी तेवढा प्रतिभा संपन्न नाही, कार्यक्षेत्र मोठे आहे ते एका लेखात लिहिणे अशक्यप्राय बाब आहे पण त्यांचा एक सहकारी म्हणून मला जो त्यांचा जवळपास ३६ वर्षाचा सहवास लाभला तो निश्चितच मार्गदर्शक व प्रेरणादायी होता. डॉ. बाळासाहेब गोडबोले भूगोल विषयाचे गाढे अभ्यासक, प्राध्यापक व संशोधक आहेत. ३२ वर्ष भूगोल विषयाचे अध्यापन केलेले आहे . भूगोल विषय म्हटला की बहुतेकांच्या कपाळावर वळ्या पडायला आणि चेहऱ्यावर उन्हाळी वावटळ फिरायला लागल्याचे दिसू लागते. पण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने कुठलाही निरस वाटणारा विषय मन लावून तल्लीन होऊन त्यांच्या यशस्वीतेसाठी झटले की, त्यातून यशाला भरती आल्याशिवाय राहत नाही. डॉ. गोडबोले सरांनी आपल्या कार्यकाळात विद्यार्थ्यांमध्ये समरस होऊन अवघड विषय सोपा करून शिकवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. डॉक्टर बाळासाहेब गोडबोले हाडाचे शिक्षक आहेत, अध्यापनावर त्यांची नितांत निष्ठा आहे. आपल्या विषयावर त्यांची श्रद्धा आहे, त्यांचे प्रेम आहे. खरा प्राध्यापक हा केवळ शिकवत नाही तर विद्यार्थ्यांना प्रेरणा देतो, शिस्त, संस्काराचे धडे आपल्या अध्यापनातून व प्रत्यक्ष कृतीतून देतो, सरांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत आपल्या निवृत्तीपर्यंत तीच भूमिका निभावली, सरांचे आडनाव गोडबोले असले तरी ते कडक शिस्तीचे भोगते असल्यामुळे ते विद्यार्थ्यांशी गोड संवाद करण्याऐवजी कडक व रागावून संवाद साधत असत, पण त्यामागे विद्यार्थ्यांचे हीत हीच भूमिका असे. स्पष्टवक्तेपणा, निर्भीडपणा, तत्त्वनिष्ठपणा, सामान्य व हुशार विद्यार्थ्यांबद्दल सतत तळमळ, सामाजिक बांधिलकी, प्रभावी अध्यापन, लेखन कौशल्य, व्यवहारातील पारदर्शकपणा, कडक शिस्तीचे भोक्ते पण तितकेच मनाने भावूक ही त्यांची विविध अफलातून गुणवैशिष्ट्ये आहेत. सरांच्या कडक शिस्तीमुळे आणि व्यवहारातील पारदर्शकतेमुळे अनेक जण त्यांच्यापासून दुरावले पण त्याचे शल्य त्यांनी कधीच बाळगले नाही आणि आपल्या स्वभावात, वर्तनात कधीच बदल केला नाही. हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील वेगळेपण मला सातत्याने त्यांच्या सहवासातून फारच भावले. वर करणी ते नारळाच्या वरच्या भागाप्रमाणे टनक असले तरी आतून मात्र ते नारळाच्या गुणधर्माप्रमाणे अत्यंत मुलायम व तितकेच गोड आहेत. हे त्यांच्या सहवासात आल्यानंतरच कळते. डॉ. बाळासाहेब गोडबोले सरांचे जीवन हे एका विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे जीवन आहे. ते कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, प्राचार्य डॉक्टर सुरेश वाघमारे यांचे विद्यार्थी आहेत. लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात सरांनी पदवीपर्यंतचे शिक्षण वसतिगृहात राहून पूर्ण केले. तर पद्व्युत्तर शिक्षण राजश्री शाहू महाविद्यालय लातूर येथून पूर्ण केले. पीएचडी साठीचे संशोधन त्यांनी लातूरचा नागरी भूगोल या विषयावर केले आहे. आई-वडिलांच्या विचाराचा, त्यांनी केलेल्या संस्कारांचा, वारकरी संप्रदायाचा, आंबेडकरी चळवळीचा त्यांच्यावर सखोल प्रभाव आहे. तो त्यांच्या कृतीतून जाणवतो . अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करित ते उच्चविद्याविभूषित झाले. शिक्षण क्षेत्रातले एक ध्येयवादी व्यक्तिमत्व म्हणून आम्ही त्यांच्याकडे पाहतो. डॉक्टर गोडबोले सरांनी डीएड महाविद्यालय बाबळगाव येथे दीड वर्ष अध्यापनाचे कार्य केले. १९९३ साली महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात भूगोल विषयाचे अध्यापक म्हणून रुजू झाले. १९९३ ते २०२४ असा त्यांचा जवळपास ३२ वर्षाच्या शैक्षणिक प्रवासाचा आलेख सतत चढताच राहिलेला आहे. डॉ गोडबोले सरांचे सगळ्यात मोठे योगदान म्हणजे एन.सी.सी. ऑफिसर, लेफ्टनंट आणि कॅप्टन म्हणून केलेले कार्य, सन २००० ते २०२४ या २४ वर्षांच्या कार्यकाळात हजारो विद्यार्थ्यांना स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरील शिबिराच्या माध्यमातून शिस्तीचे, व्यक्तीमहत्व विकासाचे, राष्ट्रभक्तीचे व पर्यावरण संवर्धनाचा संदेश आपल्या कृतीतून दिला. मी अनेकांच्या जीवनाला आकार दिला. सरांनी कमवा व शिका या योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले. काळातील त्यांच्या कार्याची दखल येऊन सन २०२२ मध्ये भारत सरकार व संरक्षण मंत्रालयातर्फे हा मधील सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रात एकमेव ऑफिसर म्हणून त्यांची निवड करण्यात आलेली होती. भारत सरकार व संरक्षण मंत्रालय द्वारा बहाल करण्यात येणारा हा पुरस्कार महाराष्ट्रातील एकमेव देशात सहा जणांना दिला गेलेला आहे. ही तमाम लातूरकर व महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या दृष्टीने सार्थ अभिमानाची बाब आहे.



सरांची मुख्य कार्य म्हणजे त्यांची ग्रंथसंपदा होय. आणि भूगोल विषयातील क्रमिक व संदर्भ ग्रंथाचे मराठी व इंग्रजी भाषेत लेखन केले आहे. आपत्ती व्यवस्थापन अशा दहा अनमोल ग्रंथाचे लेखन त्यांनी केले आहे. यांचे हे ग्रंथ अभ्यासकांच्या दृष्टीने प्रेरणास्त्रोत आहेत. याशिवाय स्थानिक राज्य, राष्ट्र आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन पत्रिकेत त्यांचे शोध निबंध प्रकाशित झाले आहेत. त्याशिवाय त्यांनी श्रीलंका, थायलंड, अमेरिका व लंडन येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंधाचे वाचनही केले आहेत. यासाठी त्यांना विशेष फेलोशीपही देण्यात आली होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळा पैलू विद्यार्थ्यांना नवोदित प्राध्यापकांना निश्चितच नवदिशा देणारा आहे. हे त्यांचे कार्य भुगोलाविषयी विशेष अभिरुची निर्माण करणारे आहे. महाविद्यालयातील त्यांचे विशेष कार्य म्हणजे या परीक्षा केंद्रातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी त्यांनी केलेले विशेष प्रयत्न होय. या समितीच्या माध्यमातून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे, व्यक्तिमत्व विकासाचे धडे दिले, यांच्या मार्गदर्शनामुळे २ आयएएस ऑफीसर, ४ पोलिस उपअधीक्षक, २ उपजिल्हाधिकारी, १८ पोलिस निरीक्षक, १ विक्रीकर निरीक्षक, ऑफिसर, पोलिस व सैन्यात अन्य पदावर निवड झाली आहे. डॉक्टर गोडबोले सरांची व्यक्तिमत्व हे बहुआयामी आहे. बोल विषयाचे गाढे अभ्यासक व संशोधक, उत्कृष्ट लेखक, पर्यावरण प्रेमी, सामाजिक भान व जाण असणारे व्यक्तिमत्व, स्पर्धा परीक्षा व व्यक्तिमत्व विकास केंद्रातून प्रशासकीय अधिकारी घडविणारे कुशल नेतृत्व, त्या माध्यमातून युवकांना शिस्तीचे धडे देणारे प्रभावी नेतृत्व आणि सुंदर हस्ताक्षर व लेखनातून विद्यार्थ्यांवर भुरळ टाकणारे व्यक्तिमत्व असे हे अष्टपैलू, बहुआयामी व्यक्तिमत्व असलेले डॉक्टर बाळासाहेब गोडबोले सर आमचे ज्येष्ठ मित्र, मार्गदर्शक महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक, नुकतेच प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. तरी ते ज्ञानसेवेत निरंतर कार्यरत राहतील. सरांचे विविध क्षेत्रातील हे कार्य येणाऱ्या काळात निश्चितच युवा पिढींना मार्गदर्शक व दिशादर्शक ठरेल.

********

प्रा. डॉ. सदाशिव बाळकृष्ण दंदे
इतिहास विभागप्रमुख
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर
मो. न. ९४२३७१९८६४

# प्रा.ज्ञानेश वाकुडकर वाकड्यात शिरू नका ...सत्य असत्याशी मन केले ग्वाही ।मानियाले नाही बहुमता ।।

राष्ट्रसंत तुकाराम महाराज म्हणतात,हे सूत्र वरकरणी साधे आणि सोपे वाटत असले, तरी प्रत्यक्षात आचरण्याच्या दृष्टीने अवघड आहे.बहुमताला नाकारणे आणि आपल्याच मनाच्या काट्यावर स्वतःला तोलने ही का साधी गोष्ट आहे? परंतू तुकारामांनी हे दिव्य सहजपणे केले; कारण आयुष्य समजाऊन घ्यायचे असेल तर स्वतःशी प्रामाणिक राहिले पाहिजे.स्वतःला विचारवंत,कवी म्हणून समाजात मिरवणाऱ्या प्रा.ज्ञानेश वाकुडकर यांचा राष्ट्र महाराष्ट्र या चॅनलवर लोकजागर मध्ये आकस भावनेतून आपल्या मालकाला खूश करण्यासाठी श्रद्धेय ड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या राजकारण विषयी काहीच माहीत नसताना क ला क कविते प्रमाणे आंबेडकरी राजकारण संपण्याच्या मार्गावर? हा व्हिडिओ ऐकला आणि त्यांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटली. हा माणूस किती बोलतो? काय बोलतो? बोलताना त्याचे त्यालाच भान असू नये काय? ही किती वाईट परिस्थिती आहे. हे ऐकून महाराष्ट्रात सामाजिक,राजकारणाची किती पडझड होत आहे,याचे खूप दुःख झाले.हा अंक शास्त्राचा प्राध्यापक शब्दांना कसा जाणून बुजून गाभण करतो. हे सगळे मुळात वाईटच आहे. असो.त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरं देऊ या मुळात या विषयी टाईमपास करणे मला ही आवडत नाही आणि कुणाचे मन दुःखेल हे ही आमच्या विचाराला पटत नाही.पण काय करणार खोटं खोटं बोलून गोल गोल फिरून प्रसिद्धी कधी कशी मिळेल हा त्यांचा प्रश्न सुन्न करणारा आहे. असो. मुळात या माणसाने चळवळीचे मोजमाप करण्याचा गुत्ता घेतला का? की आंबेडकरी चळवळ संपण्याच्या मार्गावर आहे ? असे म्हणून,अरे बाबा तू कोण आम्हाला सांगणारा? तू कोण लागून बसलास? एवढा कळवळा वाटत असेल तर ये आंबेडकरी चळवळीत आणि वाचव संपविण्या पासून.म्हणजे मी नाही त्यातली आणि कडी लावा आतली म्हणजे कुणाच्या सांगण्यावरून व्हिडिओ बनवायचा आणि साहित्यिक म्हणून मिरवायचे, हे जमणार नाही. कारण आंबेडकर हा आमचा ऑक्सीजन आहे. हा थांबविण्याचा कार्यक्रम प्लीज थांबवा आणि तुमच्या सारख्या कडून ह्या अपेक्षा नाहीत. राहिला प्रश्न मालकाचा. त्यांना म्हणावं तुला भूमिका घेता येत नसेल तर घेऊ नको; पण आव आणू नको,कारण हे बेगडी राजकारण गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्र अनुभवत आहे. कोण? कोण? किती धुतल्या तांदळाचा आहे हे सर्वांना माहीत आहे.

देशातील कुठलीही निवडणूक येताच वाकुडकर सारखे सुपारीबाज विचारवंत अलीकडच्या काळात मतदान जवळ आले, की पावसाळ्यातील छत्री प्रमाणे उगवताना दिसतात.मुळात ज्यांना आंबेडकरवाद आणि आंबेडकरी चळवळीचा इतिहासच माहीत नाही.अश्यानी आंबेडकरी चळवळीच्या संदर्भात बोलण्याची काय गरज? पण मालकाला कोण खूश करणार ?.असे वैचारिक सालगडी जबरदस्तीने शब्दांना गाभण करून आपला विवेक बाजूला सारून आपल्या डोक्यात दुसऱ्याचा उसना मेंदू घेऊन हा असा,तो तसा, त्यांनी हे करायला पाहिजे, त्यांनी ते करायला पाहिजे हे सांगणारे मोहदय तुम्ही कोण? ज्यांना बाबासाहेब समजले नाहीत.त्यांनी बाळासाहेबां विषयी बोलू नये. हा साधा विषय आहे. ज्यांना ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या विद्वत्ते विषयी काहीच माहीत नसताना त्यांच्या विषयी एव्हढी आगपाखड कश्यासाठी ? हा एक प्रश्न निर्माण होतो. मान्य आहे,तुम्हाला ज्यांनी रोजी रोटी दिली त्यांना खूश करण्यासाठी तुम्हाला हा खटाटोप करावा लागतो; पण कोणा विषयी तुम्ही बोलता याचे भान असायला पाहिजे राजे हो ! अहो सुरुवातीलाच तुम्ही म्हणाले ॲड.प्रकाश आंबेडकर हे बाबासाहेबांचे पणतू आहेत. तुम्हाला बाळासाहेबांचे आणि बाबासाहेबांचे नाते तरी माहीत आहे का ? आणि नातू आणि पणतू यातील फरक सुद्धा आपणास कळतो काय ?.ही सर्व दिशाभूल कशासाठी आपण करता ? हे फार बालिश पणाचे वागणे आहे राजे हो ! याही पुढे जाऊन तुम्ही म्हणता ॲड.प्रकाश आंबेडकर,हे बाबासाहेबांचे कौटुंबिक वारसदार आहेत की विचारांचे वारसदार आहेत? तुमचा अभ्यास कमी असल्याने आपण गोंधळात पडला, आमचे वारसदार हे तुम्ही आम्हाला कश्याला शिकवता वाकुडकर तुमच्या बोलण्यातून असे दिसून येते की,तुम्ही कुणाची सुपारी घेऊन बोलता ? येवढे आम्ही नादान नाही.तुम्ही फक्त बोलताना सांभाळून बोलायला हवे होते. तुमच्या बोलण्यातून एक आकस दिसून येतोय आणि वरून म्हणता सुद्धा बाळासाहेबांचे राजकारण हे संभ्रमित करणारे आहे.या विषयी तुम्हाला काय बोलावे, हेच मला कळत नाही.लाचारीची ही काही हद असते कविवर्य.

बाळासाहेबांना कोणत्या दिशेने जायचे आहे.त्यांचे आकलन काय आहे. या साठी तुमच्या सोबत आम्ही मीटिंग घ्यायला हवी काय? आणि तुम्ही कोण लागून बसले आम्हाला प्रश्नांकीत करायला. तुमचे बोलणे म्हणजे रेड्याच्या मुखातून वेद वदवून घेण्या सारखे आहे. तुम्हाला राजकारण कळत नसेल तर राजकारणावर कश्याला बोलता. पुन्हा एक दोन कविता लिहून कवी संमेलन गाजवा की आणि बोलयचेच असेल तर तुमच्या मालकाच्या राजकारणावर बोला साहेब तुम्हाला कोणी रोखून ठेवले,त्यांना दिशा दाखवा त्यांना भूमिका स्पष्ट करायला शिकवा तुम्हाला कोणी अडविले का ? पण तुम्ही जाणिवपूर्वक समाजात विष कालवून जातियद्वेश पसरवत आहात हे आम्ही खपवून घेणार नाही. तुमची विद्वत्ता तुमच्या कडे ठेवा प्लीज आम्हाला सल्ले देऊ नका. तुम्ही कवी आहात,लेखक आहात म्हणून कोणावर काही ही आक्षेप घेऊन बोलण्याचा गूत्ता घेतला काय? तुम्ही काही ही बोलावे आणि आम्ही चूप रहावे हे कुठं तरी थांबवा . तुमच्या सारख्याना शब्दांचे मार्मिक कळत नसेल तर त्या विषयी बोलताच कश्याला ? गाड्या फोडण्याचा मुद्दा फारच तेल मीठ लावून तुम्ही स्पष्ट केला. या मध्ये तुम्हाला काय समजले? या विषयी मला तुमच्या प्रतिभेची कीव येते. राजे हो समजणे वाले को इशारा काफि होता है । मीडिया मधील सर्वच पत्रकार आणि आपल्या सारखे विचारवंत यांना कधी कधी सामाजिक भान नसते. सांगायचे तात्पर्य असे की अकोला येथे मनसे च्या काही कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीचे मिटकरी यांची गाडी फोडली हे वाईटच आहे. या विषयी प्रसार माध्यमांनी बाळासाहेबांची प्रतिक्रिया प्रसिद्ध केली. मिटकरी,आव्हाड असल्या चिल्लर लोकांच्या गाड्या फोडू नका फोडायचा असतील तर शरद पवार,देवेंद्र फडणवीस आणि उध्दव ठाकरेंच्या गाड्या फोडा असे प्रसिद्ध झाले.थोडक्यात सांगायचे म्हणजे तुम्ही तर खूपच मोठी लिस्ट सांगितली या विषयी तुम्हाला किती माहीत आहे. हे ही समजले; पण तरी तुम्ही यातील भावना न शोधता दंगल कशी होईल हे शोधत आहात. असो कविवर्य एखाद्या झाडा बद्दल जर तुम्हाला रोष व्यक्त करायचा असेल तर त्या झाडाच्या मुळाशी आपला राग व्यक्त करा फांद्यांना छळून काय फायदा आहे. म्हणून मी आपल्या सह येथील कर्मठ प्रवृत्तीच्या पत्रकारांना सांगू इच्छितो तुम्हाला नेत्याच्या मनातील भाव ओळखता येत नसेल तर त्यावर व्यक्त होऊ नका ? समाजाला संभ्रमित कशाला करता.या प्रमाणेच वाकुडकर संभ्रमित करीत आहेत. आम्ही तळागाळातील वंचित घटकांच्या विचार करतो.आम्ही स्वाभिमानाची लढाई लढतो . आमच्या माणसांना आम्ही जागृत करतो . आरक्षण बचाव यात्रा काढून येथील एस.सी,एस.टी.आणि ओबीसी बांधवांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देतोय. म्हणून ही धास्ती तुमच्या मालकाने घेतली म्हणून तुम्ही बोलायला लागले, हे असे वागणे बरे नाही कवीवर्य.बोलतांना विचार करून बोलायला पाहिजे विचारांची लढाई विचारांनीच लढावे पोटात कपटी विचार घेऊन तुम्ही बोलता ही फार समाजासाठी हानिकारक आहे. म्हणजे मी नाही त्यातली आणि कडी लावा आतली असो हा तुमचा प्रश्न आहे. मालकाला खूश करण्यासाठी एखादा व्हिडिओ बनवायचा आणि पाकीट घेऊन मोकळे व्हायचे आणि समाजाला संभ्रमित करायचे विचारवंताच्या नावाखाली हे कसे जमणार कवी शेवटी सोना सोना होता हैं। सोन्याचे किती ही तुकडे केले तरी त्याचे मोल कमी होणार नाही हे आपण लक्षात घ्यावे.

याही पुढे जाऊन तुम्ही म्हणाला मराठा आरक्षणाचा फॉर्म्युला हा बाळासाहेब यांच्या कडे आहे फक्त आम्हाला सत्तेत येऊ दया तो आम्ही गरीब मराठा यांना देऊ हा विचार ब्लॅकमेल करणारा आहे. तुमचे हे विधान किती बालिश आहे.हे तुम्ही तुम्हालाच विचारा आणि तुमच्या मालकांनी दिलेल्या आश्वासनाचे काय झाले? याचा ही अभास करा वाकुडकर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नातवाला ब्लॅकमेल म्हनणारे तुम्ही कोण ? नाही जनाची तर मनाची तरी वाटू दया साहेब. आपण काय बोलतो? कोणा विषयी बोलतो याचे भान ठेवा. तुम्हाला एव्हढेच वाटत असेल तर वंचित बहुजन आघाडीला सत्तेत आणण्यासाठी आमच्या सोबत या, मग गरजू मराठा बांधवांना आरक्षण आम्ही कसे उपलब्ध करून देतो ते बघा. मुळात तुमची भूमिका हिन आहे, तुम्हाला काय कळतील येथील सामाजिक भावना. कारण आपल्या सारख्या विचारवंतांनी महाराष्ट्राची वाट लावली म्हणून प्रा.ज्ञानेश वाकुडकर कृपया तुम्ही वाकड्यात शिरू नका ! जय फुले, जय शाहू,जयभीम,जय संविधान...

*********

-देवानंद पवार
९१५८३५९६२८,
छत्रपती संभाजी नगर.

# ‘या’ गावात शेणाने केली जाते मारामारी; हजारो वर्षे जुनी परंपरा नक्की काय?

क्रुनुल: भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भारताच्या प्रत्येक भागांत वेगवेगळ्या जातीचे, धर्माचे लोक राहतात. प्रत्येकांचे सणसमारंभ वेगळेवेगळे असतात. अनेक प्रकारचे सण त्या सणांची परंपरा वेगळ्या असतात. असे काही सण आहेत जे काही राज्यांमध्येच साजरे केले जातात. काही सणांच्या चालिरीती तर इतक्या विचित्र असतात की त्यांच्याबद्दल ऐकल्यावर आश्चर्य वाटते. अशीच परंपरा आंध्र प्रदेशातील एका गावात प्रचलित आहे, जिथे उगादी सणाच्या निमित्ताने लोक एकमेकांवर शेणाने हल्ला करतात. ऐकून विचित्र वाटले ना?

पण मिळालेल्या माहितीनुसार, आंध्र प्रदेशच्या कुर्नूल राज्यात कैरुप्पला नावाचे एक गाव आहे. जिथे हिंदू नववर्षानिमित्त उगाडी नावाचा सण साजरा केला जातो. हा सण मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येतो. या दिवशी लोक त्यांची घरे स्वच्छ करतात. घराबाहेर रांगोळी काढली जाते. नवीन कपडे घालतले जातात. घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर आंब्याची पाने ठेवतात. तेलाने मालिश करून घरातील सदस्य आंघोळ करतात. यानंतर लोक मंदिरात जातात आणि मित्रांना भेटतात.

पहिला दिवस उपासनेत जातो, पण दुसरा दिवस आणखी विचित्र होतो. या दिवशी गावकरी दोन गट तयार करतात. आणि मग एकमेकांवर शेण फेकतात. या गावात शेणाणे मारामारी केली जाते. लोक एकमेकांवर असे शेण फेकतात जणून ते तलवारीने वार करत आहेत त्यांच्यात युद्ध सुरू असल्यासारखे वाटते. असे म्हणतात की त्या गावातील जुनी परंपरा आहे. या परंपरेला येथील लोक पिडाकला समरम किंवा पिडाकला युद्ध म्हणतात.

कशी सुरू झाली ही परंपरा? ही शेकडो वर्ष जुनी परंपरा असल्याचे येथील लोकांचे म्हणणे आहे. असे मानले जाते की देवी भद्रकाली आणि देव वीरभद्र यांचा विवाह होणार होता. वीरभद्र देवीला लग्नासाठी विचारत होता. त्यावेळी भद्रकालीने



त्याला नकार दिला आणि सांगितले की, जर तो लग्नासाठी आला तर ती त्याच्यावर शेण टाकेल. दुसऱ्या दिवशी जेव्हा वीरभद्र लग्नासाठी आला तेव्हा भद्रकालीने गावकऱ्यांना शेणाने त्याच्यावर हल्ला करण्यास सांगितले. त्यानंतर दोन्ही देवी-देवतांचे अनुयायी एकमेकांवर शेणाने हल्ला करू लागले. या घटनेनंतर देळी भद्रकाली आणि वीर भद्र दोघांनी लग्न केले. तेव्हापासून आंध्र प्रदेशातील कैरुप्पला गावांत ही प्रथा सुरू झाली. असे मानले जाते की शेण खाल्ल्याने लोकांचे आरोग्य सुधारते आणि त्या वर्षी गावात चांगला पाऊस होतो.

# सांधेदुखी असेल, तर कोबीच्या पानांचा असा करा वापर; सूज, वेदना होईल कमी; वाचा तज्ज्ञांचा ‘हा’ उपाय

आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रत्येक जण अनेक उपाय करून पाहत असतो. मग त्यात घरगुती उपाय, जुगाड किंवा हॅकचासुद्धा समावेश असतो. अशातच पाठदुखी, सांधेदुखी हा सामान्यत: वृद्धापकाळाचा आजार मानला जातो. पण, गेल्या काही वर्षांत तरुणांमध्येही या समस्या दिसून आल्या आहेत. तर सोशल मीडियावरील एका पोस्टवर केलेल्या कमेंटनुसार ‘कोबीच्या पानांमध्ये सांधेदुखी कमी करण्याची क्षमता आहे’; तर ही गोष्ट खरी आहे का? कसा करावा याचा उपयोग? याबद्दल आपण या लेखातून सविस्तर जाणून घेऊ. तर सोशल मीडियावरील एका इन्स्टाग्राम पोस्टवर कमेंट करण्यात आली होती, माझ्या हृदयातील वेदना कमी करण्यासाठी ६३ व्या दिवसापर्यंत मी माझ्या हृदयाजवळ कोबीची



पानं गुंडाळली होती. त्यात जर मेयोनीज टाकलं, तर आणखीन प्रभावी ठरेल. तर, या दाव्यात काही तथ्य आहे का हे जाणून घेण्यासाठी दी इंडियन एक्स्प्रेसने तज्ज्ञांशी संवाद साधला.होलिस्टिक पोषणतज्ज्ञ ईशा लाल यांच्या मते, कोबीमध्ये भरपूर जीवनसत्त्वं व फायटोन्यूट्रिएंट्स असतात आणि त्यात अँटिऑक्सिडंट्स व दाहकविरोधी संयुगे असतात. जेव्हा तुम्ही कोबीची पानं तुमच्या पायांभोवती गुंडाळता तेव्हा त्यातील फायदेशीर संयुगं त्वचेमध्ये शोषली जातात आणि सूज, वेदना कमी करण्यास ती मदत करतात. हा एक साधा, नैसर्गिक उपाय आहे; ज्याचा आजी-आजोबादेखील उपयोग करतात.आपण या हॅकचा उपयोग कसा करू शकतो?मार्केटमधून कोबी आणल्यावर त्याची ताजी पाने निवडा आणि ती स्वच्छ करून घ्या. ती पाने खराब नाही आहेत ना याचीसुद्धा पडताळणी करा. पानांचा रस काढण्यासाठी रोलिंग पिन, लाटणे किंवा हाताच्या साह्याने पाने किंचित कुस्करून व ठेचून घ्या. त्यानंतर तुमच्या पायांच्या किंवा सांध्याच्या दुखणाऱ्या भागावर कोबीची ठेचलेली पाने ठेवा आणि ती कापड किंवा पट्टीने बांधून घ्या. चांगल्या परिणामांसाठी पाने सुमारे दोन ते तास किंवा रात्रभर तुम्ही ठेवू शकता. तसेच तुम्ही ही प्रक्रिया दररोज चार ते पाच दिवस किंवा गरजेनुसार पुन्हा पुन्हादेखील करू शकता, असा सल्ला पोषणतज्ज्ञ ईशा लाल यांनी दिला आहे. सांधेदुखीसाठी आणखी काही नैसर्गिक पर्याय :हळद : हळद ही शक्तिशाली, दाहकविरोधी गुणधर्मांसाठी ओळखली जाते. त्यामुळे आपल्या नियमित आहारात तिचा समावेश नक्की करा.आले : आल्याच्या चहाचे सेवन करा.एप्सम सॉल्ट : गरम पाण्यात एप्सम सॉल्ट टाकून अंघोळ केल्याने वेदना व जळजळ कमी होण्यास मदत होते.तेल लावा : वेदना कमी करण्यासाठी निलगिरी, पेपरमिंट व लव्हेंडरसारख्या तेलांनी तुम्ही वेदना होणाऱ्या त्वचेवर मालिश करू शकता. व्यायाम : योगा, पोहणे आदी सौम्य व्यायाम सांधे लवचिक ठेवण्यास आणि वेदना कमी करण्यास मदत करतात.हिट ण्ड कोल्ड थेरपी : वेदना होणाऱ्या अवयवांवर हिट किंवा कोल्ड पॅक लावल्याने सांधेदुखीपासून त्वरित आराम मिळू शकतो.हे नैसर्गिक उपाय सांधेदुखीसाठी मदत करू शकत असतील तरी एखाद्या नवीन उपचारांचा प्रयत्न करण्यापूर्वी तुमच्या वैयक्तिक डॉक्टरांशी बोलून घेणे महत्त्वाचे आहे. तसेच आरोग्य सुधारण्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, तणावाचे व्यवस्थापन करणे हेसुद्धा महत्त्वाचे आहे, असे पोषणतज्ज्ञ ईशा लाल यांनी सांगितले आहे.

# लिव्हर खराब होण्याचा धोका वाटतोय? लिव्हरमधील फॅट्स झपाट्याने काढून टाकतात ‘हे’ आठ पदार्थ? सेवनाची पद्धत घ्या समजून

शरीर निरोगी ठेवण्यासाठी यकृताचे महत्त्व खूप आहे. यकृत डिटॉक्सिफाय करते आणि शरीरातील सर्व घाण काढून टाकण्यास मदत करते. शरीराचे कार्य सुरळीत सुरू राहावे यासाठी यकृताचे योगदान मोठे असते आणि म्हणून यकृत सक्षम ठेवणे, त्याची काळजी घेणे ही आपली जबाबदारी असते. हार्मोन्सचे नियमन करणे, रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करणे, केटोन्स तयार करणे व पचनास मदत करणे हे त्याचे कार्य आहे. म्हणूनच शरीराच्या या महत्त्वाच्या अवयवांची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. अयोग्य आहार, जास्त प्रमाणात मद्यपान व आनुवंशिक कारणांमुळे यकृताच्या समस्या वाढू शकतात. आहार आणि जीवनशैलीत योग्य बदल करून आपण आपल्या यकृताच्या आरोग्याची काळजी घेऊ शकतो. यकृत निरोगी आणि मजबूत ठेवण्यासाठी, आपण नेहमी योग्य तो आहार निवडणे महत्त्वाचे आहे. शिळे आणि खराब झालेले अन्न खाल्ल्याने यकृत खराब होऊ शकते. डाएट क्लिनिक जसलीन कौर यांनी यकृत निरोगी ठेवण्यासाठी पौष्टिक आहार घ्यावा याविषयी माहिती दिली आहे.माणसं ओळखायला आपण चुकतो! ज्याला जग वेडा समजत होते तोच खरा शहाणा निघाला; तखऊ्ज एकदा पाहाच



लसूण लसूण सेलेनियम आणि अँटीऑक्सिडंट्स गुणधर्मांनी समृद्ध आहे; जे यकृतातील विषाक्त घटक बाहेर टाकतात. रोज एका लसूण पाकळीचे सेवन केल्याने फायदा होऊ शकतो. ब्रोकोली हे आहारातील तंतू, पॅन्टोथेनिक ॲसिड, व्हिटॅमिन -, इ१, इ६ व ए, मँगनीज, फॉस्फरस, कोलीन, पोटॅशियम, तांबे, मॅग्नेशियम, ओमेगा -३ फॅटी ॲसिडस्, प्रथिने, जस्त, कॅल्शियम, लोह, नियासिन व सेलेनियम यांनी समृद्ध आहे. ब्रोकोली, कोबी व फ्लॉवर यांसारख्या क्रूसिफेरस भाज्यांचे सेवन आरोग्यासाठी फायदेशीर तर आहेच; पण या भाज्या यकृतदेखील निरोगी ठेवतात. या भाज्यांचे सेवन केल्याने यकृत डिटॉक्स करते. कॉफी

एका अभ्यासात असे दिसून आले आहे की, दररोज दोन कप कॉफी प्यायल्याने यकृताचा आजार असलेल्या लोकांमध्ये यकृताचा सिऱ्होसिस आणि यकृताचा कर्करोग होण्याचा धोका कमी होतो. अभ्यासानुसार यकृत सिऱ्होसिसची शक्यता ४४ टक्क्यांनी कमी होऊ शकते. काजू ओमेगा -३ फॅटी ॲसिडचा समृद्ध स्रोत असलेले नट्स यकृत साफ करण्यास मदत करतात. तथापि, गिळण्यापूर्वी काजू तोंडात बारीक होईपर्यंत चघळणे महत्त्वाचे आहे. सफरचंद सफरचंदामध्ये पेक्टन हा घटक भरपूर प्रमाणात असतो. त्यामुळे शरीराचे डिटॉक्सिफिकेशन होण्यास मदत मिळते. ऑलिव्ह ऑइल ऑलिव्ह ऑइलच्या वापराने यकृतातील चरबीची पातळी कमी करण्यास, रक्तप्रवाह वाढविण्यास आणि यकृतातील एन्झाइम्सची पातळी सुधारण्यास मदत होते. हिरव्या पालेभाज्या दैनंदिन आहारात हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करणे गरजेचे आहे. त्यात पोटॅशियम, मॅग्नेशियम व मँगनीज असतात. ती शरीरातून विषाक्त पदार्थ काढून टाकण्यास आणि यकृताचे आरोग्य चांगले ठेवण्यास मदत करतात.

# डिलिव्हरीनंतर एकही स्ट्रेच मार्क दिसणार नाही; फक्त ‘या’ टिप्स करा फॉलो

गरोदरपणात महिलांच्या शरीरात अनेक बदल होतात. ते बदल महिलांच्या शरीरावर परिणाम करणारे असतात. यातील काही बदल असे आहेत की त्यांची लक्षणे वर्षानुवर्षे दिसेनाशी होत नाहीत. यापैकी एक म्हणजे स्ट्रेच मार्क्स. गरोदरपणात पोटाच्या खालच्या भागावर, स्तनांवर, नितंबांवर आणि मांडीवर तयार होणाऱ्या रेषेसारख्या खुणा मुलाच्या वाढीदरम्यान पोटाच्या वाढीमुळे होतात.

त्यामुळे त्वचेचा वरचा आणि खालचा थर ताणला जातो. त्यामुळे कोलेजन फाटून स्ट्रेच मार्क्स तयार होतात. हे स्ट्रेच मार्क्स खूप वाईट दिसतात आणि त्यामुळे महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ते दूर करण्यासाठी ते घरगुती उपाय, उपचार किंवा क्रीम वापरतात. पण गरोदरपणात काही छोट्या गोष्टींची काळजी घेतली तर प्रसूतीनंतर एकही स्ट्रेच मार्क दिसणार नाही.



स्ट्रेच मार्क्स टाळण्यासाठी गरोदरपणात काय करावे

१. त्वचेतील आर्द्रता राखणे प्रसूतीनंतर स्ट्रेच मार्क्स दिसण्यापासून रोखण्यासाठी, त्वचा मॉइश्चराइज्ड राहणे महत्त्वाचे आहे. यासाठी पहिल्या तिमाहीपासून त्वचेवर एरंडेल तेल लावावे. याशिवाय खोबरेल तेल, रोझशीप ऑईल, ऑलिव्ह ऑईलने मसाज करू शकता. यामुळे त्वचा हायड्रेट राहते आणि स्ट्रेच मार्क्स टाळण्यास मदत होते. या तेलांमध्ये त्वचा निरोगी ठेवणारे घटक असतात, जे डाग कमी करण्यास मदत करतात.

२. पाण्याची कमतरता टाळा गरोदरपणात पाणी पिण्यात कोणताही संकोच नसावा. या काळात भरपूर पाणी प्यावे, जे आरोग्यासाठीही आवश्यक आहे. यामुळे त्वचा आतून हायड्रेट राहते आणि कोरडेपणा येत नाही. त्यामुळे स्ट्रेच मार्क्स मिळण्याची शक्यताही कमी असते. तुम्हाला हवे असल्यास पाण्याची कमतरता पूर्ण करण्यासाठी तुम्ही नारळपाणी आणि रसदार फळे देखील घेऊ शकता.

डिलिव्हरीनंतर एकही स्ट्रेच मार्क दिसणार नाही फक्त 'या' टिप्स करा फॉलो

फोटो सौजन्य : सोशल मीडिया

३. नखे खाजवू नका गरोदरपणात बाळाची वाढ झाल्यावर आईचे वजनही वाढू लागते. त्यामुळे त्यांची त्वचा ताणली जाते आणि खाज येण्याची समस्या सुरू होते. या काळात चुकूनही नखे खाजवू नयेत. यामुळे, स्ट्रेच मार्क्स देखील खोल होऊ शकतात. यासाठी तुम्ही मऊ कापडाची मदत घेऊ शकता.

४. क्रीम किंवा लोशन लावा काही स्त्रिया गरोदरपणात त्वचेला तेल लावू इच्छित नाहीत. ते व्हिटॅमिन ई, हायलुरोनिक ऍसिड आणि कोलेजन असलेली क्रीम किंवा लोशन वापरू शकतात. यामुळे त्यांची त्वचा मॉइश्चराइज राहते आणि स्ट्रेच मार्क्ससारख्या समस्याही कमी होऊ शकतात. मात्र, यासाठी आधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

तसेच त्वचा टाईट करण्यास काय मदत करते? फर्मिंग उत्पादने मसाज नॉनसर्जिकल प्रक्रिया खोबरेल तेल त्वचा टाईट करते का?

नारळाच्या तेलाला त्वचेची निगा राखण्यासाठी एक चमत्कारिक उपाय म्हणून ओळखले जाते आणि ते खरोखरच सॅगिंगचे स्वरूप कमी करण्यास मदत करू शकते. नारळाच्या तेलातील फॅटी ऍसिडस् आश्चर्यकारकपणे हायड्रेटिंग असतात, त्यामुळे ते त्वचेला अधिक सुंदर बनविण्यात आणि अधिक तरुण दिसण्यास मदत करतात.

# रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी ‘या’ फुलाच्या चहाने दिवसाची करा सुरुवात, शरीरातील इतर समस्या होतील नाहीशा

गणपती बाप्पाच्या आवडीचे फुल म्हणजे जास्वंदी. जास्वंदीच्या फुलाचा वापर धार्मिक कार्यक्रमांमध्ये आणि पूजेसाठी केला जातो. दिसायला सुंदर आणि लालचुटुक जास्वंदीचे फुल पाहायला सुंदर वाटते. हेच जास्वंदीचे फुल आरोग्यासाठी सुद्धा प्रभावी आहे. जास्वंदीच्या फुलापासून ते देठापर्यंत सगळ्याचं गोष्टीचा वापर केला जातो. आयुर्वेदातजास्वंदीच्या फुलाला विशेष महत्व असल्याने अनेक आजारांवर हे गुल गुणकारी आहे. निरोगी आरोग्यासाठी तुम्ही सकाळी उठल्यानंतर काळा चहा किंवा कॉफी पिण्याऐवजी जास्वंदीच्या फुलांचा चहा पिऊ शकता. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला जास्वंदीचा चहा प्यायल्यामुळे आरोग्याला काय फायदे होतात? जास्वंदीचा फुलांचा चहा कसा बनवायचा ? हे सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊयाजास्वंदीचा चहा बनवण्याची कृती:जास्वंदीच्या फुलांचा चहा बनवण्यासाठी सर्वप्रथम जास्वंदीची फुले आणून स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर फुलांच्या पाकळ्या वेगळ्या करून घ्या. टोपामध्ये पाणी गरम करण्यासाठी ठेवा. पाणी गरम झाल्यानंतर त्यात जास्वंदीची फुले टाकून पाण्यात उकळवून घ्या. पाण्याला चांगली उकळी आल्यानंतर गॅस बंद करून पाणी गाळून घ्या. गाळून घेतलेल्या पाण्यात लिंबाचा रस आणि मध टाकून मिक्स करा. तयार आहे जास्वंदीच्या फुलांचा चहा. हा चहा तुम्ही कोणत्याही वेळी पिऊ शकता.





जास्वंदीच्या चहामध्ये असलेले गुणधर्म आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आहेत. जास्वंदीमध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स शरीराला फ्री रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून वाचवतात. तसेच जास्वंदीच्या चहामध्ये व्हिटॅमिन सी, फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलीफेनॉल सारख्या अँटिऑक्सिडंट्स आढळून येतात, जे शरीरासाठी आवश्यक आहेत. यामुळे पोटात जळजळ किंवा बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.वाढलेले वजन कमी करण्यासाठी जास्वंदीचा चहा गुणकारी आहे. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी जास्वंदीचा चहा प्यायल्यास वाढलेले वजन आणि शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होण्यास मदत होते.

हे देखील वाचा: ब्रेन कॅन्सरबाबत कळणे आता अधिक सोपे, रक्ताच्या १ थेंबापासून मिळेल माहिती

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शरीराला थंडाव्याची आवश्यकता असते. त्यामुळे इतर पेय पिण्याऐवजी जास्वंदीचा चहा प्यावे. जास्वंदीच्या फुलांमध्ये थंडावा असल्यामुळे शरीराला फायदा होतो.

उच्च रक्तदाबाच्या समस्येने त्रस्त असलेल्या लोकांनी दैनंदिन आहारात काळा किंवा दुधाचा चहा पिण्याऐवजी जास्वंदीच्या फुलांचा चहा प्यावा. यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहील.

# नवी मुंबई बसपा च्या वतीने शासनकर्ती जमात बना, अभियानास सुरवात

नवी मुंबई / के.एच. हनवते :- बहुजन समाज पार्टी नवी मुंबई आयोजित शासनकर्ती जमात बना..! डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाहीलेले स्वप्न प्रबुद्ध भारत अशोक सम्राटचा भारत साकार करण्याची जिम्मेदारी आपल्या सर्वांचीच आहे आणि म्हणून या अभियानाची सुरवात नवी मुंबईतील आम्ही सारे ८५% वंचित बहुजन समाज एक होऊ महाराष्ट्राची सत्ता आपल्या हाती घेऊ..! मिशन २०२४ या अभियानाची सुरवात घनसोली स्टेशन पासुन करण्यात आली आहे हे अभियान संपूर्ण नवी मुंबईतील विविध ठिकाणी जाऊन जनतेशी संवाद साधणार आहे आसे या अभियानाचे उद्घाटन ठाणे जिल्हाध्यक्ष : संतोष भालेराव यांच्या शुभ हस्ते झाले त्यावेळी त्यांनी आपली स्पष्ट भुमिका जाहीर केली. ते म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे की जा आपल्या घरांच्या भिंतीवर लिहून ठेवा की मला या देशाची शासन कर्ती जमात बनायचे आहे..! आणि त्याप्रमाणे मान्यवर कांशीरामजी यांनी यु.पी. सारख्या राज्यात संघटन मजबूत केले व चार चार वेळेस आपले शासन निवडून आणले. बहन कुमारी मायावती यांना मनुवादीच्या बालेकिल्ल्यात मुख्यमंत्री बनवले आणि देशाच्या राजकारणात एक आपला वेगळाच दबदबा निर्माण केला. हे सर्व विसरून चालणार नाही जे उत्तर प्रदेशात होऊ शक्ते ते महाराष्ट्रात का ? नाही, बस आपला मतदार राजा बाबासाहेबांच्या आनंत उपकाराची जाणीव ठेवून थोडाफार इमाने इतबार आणि स्वाभिमानी राहीला तर नक्कीच महाराष्ट्राच्या विधान भवनावर निळा झेंडा फडकेल ..! तयावेळी प्रदेश कार्यकारिणी सदस्य विद्याधर किरतावडे, अँड. धनंजय माने (प्रभारी ठाणे जिल्हा), ठाणे जिल्हा महासचिव : राजेश जयस्वार, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष प्रा. दत्ता हेगडे, उपाध्यक्ष अरविंद सिंगराव, विनोद धुरंधर (अध्यक्ष बेलापूर विधानसभा), प्रभारी ऐरोली विधानसभा उमेश राम, ऐरोली विधानसभा महासचिव : जीत बहादूर, मा. दिलीप कांबळे, प्रफुल्ल हंबर्डे, बामसेफ चे पगारे साहेब, सचिन जाधव, संदेश कांबळे घणसोली सेक्टर अध्यक्ष, यांच्यासह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.





## जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगावचा संघ प्रथम

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव द्वारा संचलित कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगावच्या हॉकी संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आणि विभागीय स्पर्धेमधील आपले स्थान निश्चित केले. दयानंद विद्यालय बाभळगावच्या क्रीडांगणावर क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा अधिकारी कार्यालय, लातूर यांच्या वतीने आयोजित

जिल्हास्तरीय नेहरू हॉकी स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने अंतिम सामन्यात ०-२ अशी आघाडी घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला.

यशस्वी खेळाडू मध्ये कर्णधार अरमान गौस सुभेदार,उपकर्णधार रमण प्रशांत माने, आदित्य विलास कांबळे, राजू मारुती कांबळे, विद्यासागर किशन संघापुडे, तुषार माधव भंडे, लक्ष्मण भजनदास पाटील, विशाल दशरथ देशमुख, भरत पिराजी रानवेढे, शरद संतोष केंगार, अनुराग ज्योतिराम तोडकर या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, क्रीडा सचिव सलगरकर आप्पा, शंकराव जावळे पाटील विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, लोहारा जि. धाराशिव येथील डॉ. शिवाजी कदम, डॉ. रामेश्वर धप्पाधुळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक सारिका माने, पंच साहिल समदूरले, कार्तिक मस्के, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ.शाहूराज मुळे, डॉ. अभिजीत बादाडे, प्रा. चंद्रकांत मोरे, डॉ.अजित भांजी, प्रा.सुरेश बिराजदार, डॉ. अंगद कोते, हनुमंत शिंदे, प्रा.संतोष कल्याणकर, प्रा. रोहन जटाळ यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# खा.अजित गोपछडे यांच्या नेतृत्वात वीरशैव लिंगायत सन्मान यात्रा

### आज अहमदपूर येथून होणार शुभारंभ

लातूर/प्रतिनिधी :- खा.अजित गोपछडे यांच्या नेतृत्वात वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेच्या माध्यमातून वीरशैव लिंगायत समाजाच्या धार्मिक, सामाजिक शैक्षणिक, सहकार अशा विविध क्षेत्रातील सेवावृत्तीने उल्लेखनीय काम करणाऱ्या समाज बांधवांना सक्षम भेटून खा. अजित गोपछडे त्यांचा सन्मान करणार आहेत.

गुरुवार दि.५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य अहमदपूरकर महाराज यांच्या समाधी स्थळाला अभिवादन करून या यात्रेचा शुभारंभ होणार आहे.भक्ती स्थळ ते शक्ति स्थळ असा या सन्मान यात्रेचा मार्ग आहे. लातूर,धाराशिव,सोलापूर, सांगली,कोल्हापूर,सातारा, पुणे या वीरशैव लिंगायत बहूल जिल्ह्यातून या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.२१ सप्टेंबर रोजी श्रीक्षेत्र मंगळवेढा या ठिकाणी यात्रेचा समारोप होणार आहे.

महाराष्ट्रात वीरशैव लिंगायत समाज आपले कार्य निष्ठेने पार पाडत आला असून उद्योग, व्यापार हे क्षेत्र सांभाळत विविध क्षेत्रांमध्ये समाजातील बांधवांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे.अशा कर्तृत्ववान व्यक्ती आणि संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांचा सन्मान करावा ही आमची प्रामाणिक भूमिका असल्याचे मत खा. अजित गोपछडे यांनी व्यक्त केले.




दरम्यान या सन्मान यात्रेच्या प्रारंभीच खा. अजित गोपछडे यांच्या खासदार निधीतून राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज भक्ती स्थळाच्या सुशोभीकरण व विविध विकास कामांसाठी ३१ लक्ष रुपयांचा निधी देऊन ही यात्रा मार्गस्थ करणार असल्याचे खा.गोपछडे यांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# शहावली दर्गाची पूर्वभींत कोसळली,समाधीही कोसळण्याची शक्यता प्रशासनाने दुरुस्ती करुन देण्याची भाविक भक्तांनी केली मागणी

लातूर :- बौध्द नगरच्या उतरेकडील ताजोद्दीन बाबा नगरातील शहावली व ताजोद्दीन बाबा दर्गाची पूर्वेकडील भींत गेली तीन दिवसाच्या भीज पावसाने सोमवारी मध्यरात्री कोसळली आहे,यात कोणतीही जिवीत हानी झालेली नाही तथापि शहावली यांची समाधीही कोसळून समाधीची विटंबना होण्याची शक्यता निर्माण झाल्याने प्रशासन व समाजाने याची तातडीने दखल घेवून ही पडलेली भींत पूर्ववत पक्की बांधून देवून येथे वीज जोडणी देवून,पिण्याचे पाण्यासाठी बोर बसवून द्यावी,दर्गाचे सुशोभिकरण करावे,अशी मागणी भाविक भक्तांनी आज दि. ३ सप्टेंबर रोजी केली आहे.

लातूरच्या पूर्व भागातील बौध्द नगराच्या उत्तरेला,विवेकानंद चौक ते श्री सिध्देश्वर मंदिराला जाणार्या रोडलगत ताजोद्दीन बाबा नगर या भागातील टेकडीवर मुस्लिम आणि अन्य व समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या शहावली व ताजोद्दीन बाबा या दोन मुस्लिम संतांची समाधी आहे.या ठिकाणी दरवर्षी दि.२ फेब्रुवारी रोजी गेली अनेक वर्षांपासून मोठ्या भक्तीभावाने व हजारोंच्या संख्येने उरुस (स्मृतिदिन)साजरा केला जातो.लोकनेते विलासराव देशमुख व परिवारातील सदस्यांसह विविध राजकीय पक्षाचे वरिष्ठ नेते,विविध पक्षांचे कार्यकर्ते या उरुसाला हजेरी लावून दर्शन घेतात,सहभाग देतात.या समाधी स्थळाच्या संरक्षक भींत,स्लॅब,सिमेंट पायर्या व सुशोभिकरणासाठी अनेक गणमान्य नेत्यांनी अर्थसाह्य केले आहे.सर्वांच्या श्रध्देचे ते एक ठिकाणी ठरले आहे.



ताजोद्दीन बाबा नगरातील या संत शहावली व ताजोद्दीन बाबा दर्गाला पूर्व,दक्षिण,उत्तर बाजूने गेली काही महिन्यांपूर्वी संरक्षक भींत उभारली आहे, पूर्वेला पुढे वस्तीकडे जाणारा कच्चा रस्ता आहे. लातूर परिसरात गेली तीन दिवसांपासून भीज पावसाने हजेरी लावल्याने सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे तसेच या संरक्षण भिंतीच्या कामात काही मातीची भर घातली असून, पूर्वेकडील भागाला धरून ठेवेल असे काम झाले नसल्याने कालमसह सिमेंटची संरक्षक भींत सोमवारी मध्यरात्री कोसळली आहे, आता शहावली यांची समाधीही दोन ते अडीच फुटाच्या अंतरावर असून,ती केव्हाही कोसळू शकते आणि समाधीची विटंबना होवू शकते.या समाधीच्या तिन्ही बाजूने समाधी बांधकामाला तडे गेल्याचे पाहायला मिळाले.

सदर घटनेबाबत या दर्गाची सेवा,झाडलोट करणारे भाविक हजहर हुसेन शेख यांनी दुःख व्यक्त केले असून,प्रशानाने व समाजाचे याबाबीकडे वेळीच लक्ष देवून तातडीने शहावली व ताजोद्दीन बाबा दर्गाची कोसळलेली भींत पूर्ववत बांधण्यासाठी पुढे यावे गरजेचे आहे.या ठिकाणी विंधन विहीर घेतलेली असून,आर्थिक व तांत्रिक अडचणी,परिस्थितीमुळे त्यावर विद्युत पंप,वीज जोडणी करण्यात आलेली नाही,या समस्या सोडविणे आवश्यक असल्याचेही अजहर शेख यांनी सांगितले.

# शैक्षणिक पंढरी लातूर येथे एआयआयएमएस, आयआयटी व केंद्रीय विद्यापीठाची निर्मिती करा

लातूर/प्रतिनिधी : लातूर ही शैक्षणिक पंढरी म्हणून ओळखली जाते, त्यामुळे राज्यासह देशभरातील विद्यार्थी शिक्षणासाठी लातूरला येतात. शिक्षण घेणार्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे या वाढत्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी लातूर येथे एआयआयएमएस, आयआयटी व केंद्रीय विद्यापीठाची मागणी करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर यांनी केंद्रीय नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपाचे प्रदेश सचिव तथा लातूर जिल्हा प्रभारी किरण पाटील, प्रदेशाध्यक्ष भाजपा व्हीजेएनटी आघाडी तथा लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, भाजपाचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, सरचिटणीस दिग्विजय काथवटे, लातूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, सतीश ठाकूर, जेएसपीएमचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, संचालिका सौ. आदिती अजित पाटील कव्हेकर,भाजपाचे सरचिटणीस निळकंठराव पवार, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके,बाबासाहेब देशमुख, सुभाषअप्पा सुलगुडले, मंडळाध्यक्ष संजय गिर, गोपाळ वांगे, शिरीष कुलकर्णी आदी उपस्थित होते.

शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य शहर म्हणून लातूर शहराची ओळख आहे. देशाच्या विविध भागातून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी लातूरमध्ये येत असतात. तसेच नामांकित



वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण संस्थेत सर्वाधिक प्रवेश घेणारे विद्यार्थी हे लातूरचेच असतात. नीट, जेईई यासारख्या महाविद्यालयांमध्ये सर्वाधिक लातूरचे विद्यार्थी प्रवेश घेतात. यातील बहुतांशी विद्यार्थ्यांची परिस्थिती हालकीची असते,त्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी दूर जाणे शक्य होत नाही. म्हणून अशा विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सोय लातूरमध्ये व्हावी यासाठी अशा उच्च दर्जाच्या शैक्षणिक संस्था लातूरमधे उभ्या करण्यात याव्यात.

लातूर शहरात विमानतळ अस्तित्वात असून त्याचा वापर फक्त विशेष कामासाठीच होतो. सामान्य नागरिक या विमानतळाचा वापर करू शकत नसल्याने, लातूरच्या विमानतळाचा समावेश उडाण योजनेत करून मुंबई, पुणे, हैदराबाद, बंगळुरू या ठिकाणी प्रवास करू इच्छिणार्या प्रवाशांसाठी विमानतळ खुले करावे अशीही मागणी त्यांनी यावेळी केली आहे. हवाई प्रवास करू इच्छिणार्या प्रवाशांना सध्या नांदेड व छत्रपती संभाजीनगरला जावे लागते. यामुळे अनेक प्रवाशांचा वेळ वाया जातो, तो वेळ वाचवण्यासाठी लातूरचे विमानतळ सामान्य प्रवाशांसाठी खुले करणे गरजेचे आहे.

सध्या ड्रोन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होत असतात. ड्रोन मॅन्युफॅक्चरिंग लातूरला झाल्यास या माध्यमातून रोजगाराचा मोठा प्रश्न सुटू शकतो. ज्या पद्धतीने शैक्षणिक क्षेत्रात लातूर पॅटर्न तयार झाला आहे त्याचप्रमाणे लातूर ड्रोन पॅटर्न बनू शकतो. ड्रोन मॅन्युफॅक्चरिंगच्या माध्यमातून रोजगारासाठी होत असलेले स्थलांतरही थांबू शकते. या तंत्रज्ञानामुळे कृषी क्षेत्रातही मोठी क्रांती होऊ शकते, त्यामुळे लातूरकरांच्या सोयीसाठी आदी प्रश्न मार्गी लावण्यात यावेत. या निवेदनावर युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर यांची स्वाक्षरी आहे. यावेळी भाजपा ज्येष्ठ पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संवाद व संबोधन कार्यक्रम आनंद सोहळा होतो तेंव्हा . उखाणे स्पर्धा, पैठणी वाटप, रांगोळी आणि नवी उमेद

उदगीर, (लातूर)दि. ०४ सप्टेंबर: राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या संबोधनात काय ऐकायला मिळणार ! मुख्यमंत्री अर्थात लाडक्या बहिणींचा भाऊ नवीन काय संदेश देणार... तर देवेंद्र फडणवीस नवीन काय बोलणार अशा सर्व उत्सुकतांना घेऊन जिल्हाभरातील महिलांच्या उदगीर येथील हजारोंचा समुदाय आज सेलीब्रेशन मूडमध्ये होता. त्यामुळे पोस्टर, बॅनर, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्याशी हस्तांदोलन तर कुठे रक्षा बंधन असा एकूणच आनंददायी माहौल उदगीरच्या महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर होता. त्यामुळे संवाद संबोधनाचा कार्यक्रम आनंद सोहळा झाला होता. या आजच्या कार्यक्रमात महिलांच्या मनोरंजनासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उखाणे स्पर्धा, पैठणी वाटप, विविधांगी घोषवाक्य प्रत्येकाचा वेगळा ड्रेसकोड आणि महाराष्ट्राच्या वैभवाची सुरेल संगीत मैफील यामुळे आनंद मेळावा आणखी मजेदार झाला. या कार्यक्रमाला जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर महिला सरपंच पिवळ्या रंगाचे फेटे परिधान करून आल्या होत्या. त्यांच्या हाती राज्य शासनाच्या विविध महत्त्वाकांक्षी योजनांचे आणि मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच मंत्री महोदयांचे छायाचित्र असलेले फलक उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते. या फलकांवर विशेषत्वाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री लेक लाडकी योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण कार्यक्रम योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुलींसाठी उच्च शिक्षण मोफत योजना यासह महिलांच्या सशक्तीकरणावर भर असलेल्या योजनांच्या फलकांचा समावेश होता. आकर्षक व्यासपीठ राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू, राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्यासह मान्यवरांच्या स्वागतासाठी शहरातील प्रमुख मार्गावर आकर्षक कमानी उभारण्यात आल्या होत्या. सोबतच महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमासाठी मुख्य व्यासपीठ विविध रंगीबेरंगी पुष्पगुच्छांनी सजविण्यात आले होते. व्यासपीठावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अर्धाकृती पुतळा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आणि विशेषत्वाने देशाला महाराष्ट्राची महिला सशक्तीकरणाच्या योगदानातून नवी ओळख देणाऱ्या रमाबाई आंबेडकर, सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ आणि पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमा उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होत्या. तसेच व्यासपीठासमोरील जागेत कृषि विभागाच्यावतीने काढण्यात आलेली बाजरा, भगर आदी विविध धान्यापासून रांगोळी काढून मिलेट वर्ष साजरे करताना नागरिकांनी आपल्या आहारात कडधान्याचा वापर करण्याचा 'मिलेट हट'च्या माध्यमातून संदेश देण्यात आला होता. आशयपूर्ण रांगोळ्या साधारणत: रांगोळी हा कलात्मक प्रकार त्यातील रंग छटा आणि रेखाचित्रांवर असते. मात्र, आज आनंद मेळाव्यात काढण्यात आलेली रांगोळी आशयघन होती. रांगोळीला काही बोलायचे होते, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना व तृणधान्यांचा वापर याचा संदेश या रांगोळीतून दिला जात होता.

शहरात मान्यवरांचे आकर्षक कटआऊट्स आजच्या कार्यक्रमासाठी ऐतिहासिक नगरी उदगीर शहरात येणाऱ्या देशाच्या प्रथम नागरिक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे आणि महिला व बाल कल्याण मंत्री श्रीमती आदिती तटकरे यांचे लक्षवेधक कटआऊट्स शहरात तसेच कार्यक्रमस्थळी लावण्यात आले होते. मुख्य कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. संदीपान जगदाळे व सहकारी लातूर, जल्लोष ग्रूप नागपूर आणि येडवे व बिदरकर गुरुजी, सोलापूर यांच्या चमूने उपस्थितांसमोर विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाच्या स्थळी राज्य शासनाच्या कृषी विभाग, रोजगार उद्योजकता व कौशल्य विकास विभाग, समाज कल्याण, सामाजिक न्याय विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग, जिल्हा आरोग्य विभाग यासह विविध विभागाच्या स्टॉल्सद्वारे शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE